**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हेनेझुएलाच्या प्रभारी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांच्या द्विपक्षीय बैठकीत उभयपक्षी ऊर्जा भागीदारी बळकट करण्याविषयी चर्चा
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या ५ उमेदवारांची माघार / कोकणातल्या दोन्ही जागा, पुणे आणि यवतमाळमधे महायुतीच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा
- योग ही भारतानं मानवजातीला दिलेली कालातीत देणगी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं जागतिक योगासन क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात प्रतिपादन
- मोसमी पावसाचं केरळममधे आगमन

**आणि**

- प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि सेन्सॉर बोर्डाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हेनेझुएलाच्या प्रभारी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय बैठक झाली. ऊर्जा सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, औषधनिर्माण, आरोग्य सेवा, नवीकरणीय ऊर्जा आदी क्षेत्रातील सहकार्याविषयी या बैठकीत दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

दोन्ही देशातली ऊर्जा भागीदारी बळकट करण्याविषयी यावेळी चर्चा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातले सचिव रुद्रेंद्र टंडन यांनी बातमीदारांना सांगितलं. व्हेनेझुएलाकडे जगातला सर्वात मोठा तेलसाठा असून भारत हा दीर्घकाळासाठी खरेदीदार देश असेल असा त्यांना विश्वास आहे, असं टंडन म्हणाले. ऊर्जा क्षेत्राशिवाय वाहतूक, कृषी उपकरणं, औषधनिर्माण आदी क्षेत्राविषयीही दोन्ही

नेत्यांनी चर्चा केल्याचं टंडन यांनी सांगितलं. तसंच विविध जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवरही मोदी आणि रॉड्रिग्ज यांनी यावेळी चर्चा केली.

त्याआधी डेल्सी रॉड्रिग्ज यांनी परारष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्यांच्या भारत भेटीमुळे दोन्ही देशातले संबंध अधिक बळकट होतील अशी आशा जयशंकर यांनी व्यक्त केली.

**<><><><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत आज संपल्यानंतर निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं आहे.

**ठाणे-पालघर** मतदारसंघातले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे उमेदवार अभिजीत पवार यांनी आज उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे शिवसेनेच्या रवींद्र फाटक यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

**पुणे** मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे श्रीकांत पाटील यांनी आज माघार घेतली. तसंच भाजपाचे प्रदीप कंद आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील टिंगरे यांनीही माघार घेतली त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या विक्रम काकडे यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

**रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग** मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने यांनी आज अर्ज मागे घेतला. अर्ज मागे घेण्यासाठी जाताना मंत्री नितेश राणे बाळ माने यांच्यासोबत होते. माने यांच्यावर पक्षानं निलंबनाची कारवाई केली आहे. या मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार अरविंद म्हात्रे, तसंच अपक्ष मानसी म्हात्रे आणि अनिल चोपडा यांनीही आपापले अर्ज मागे घेतले. त्यामुळे अनिकेत तटकरे यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

**वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली** मतदारसंघातून काँग्रेसचे शैलेश अग्रवाल यांनी आज माघार घेतली. यामुळे भाजपाचे शैलेश लखाणी एकटेच मैदानात उरल्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

**बीड-लातूर-धाराशिव** मतदारसंघातल्या सात अपक्ष उमेदवारानी आज अर्ज मागे घेतले. त्यामुळे भाजपाचे बसवराज पाटील आणि काँग्रेसचे महेश देशमुख यांच्यात थेट लढत होणार आहे.

**नाशिक** मतदारसंघातून भाजपाचे बंडखोर उमेदवार गणेश गिते यांनी माघार घेतली, मात्र त्यांचे बंधू गोकूळ गिते यांनी अर्ज कायम ठेवला. तसंच भाजपाचेच प्रसाद हिरे हेही निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे भाजपाचे दोन बंडखोर विरूद्ध शिवसेनेचे नरेंद्र दराडे अशी लढत इथं होणार आहे.

**सांगली-सातारा** मतदारसंघात काँग्रेस आणि शिवसेनेच्या बंडखोर उमेदवारांनी आज माघार घेतली. इथं भाजपाचे धैर्यशील कदम, राष्ट्रवादी काँग्रेसचे अभयसिंह जगताप आणि अपक्ष किशोर धुमाळ यांच्यात लढत होईल. **सोलापूर** मतदारसंघातल्या पाच अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे भाजपाचे राजेंद्र राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वसंत देशमुख यांच्यात थेट लढत होणार आहे.

**यवतमाळ** मतदारसंघातून काँग्रेसचे साहेबराव कांबळे यांनी काल माघार घेतली. तर आज भाजपाचे नितीन भुतडा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे साजीद बेग यांनीही माघार घेतल्यामुळे शिवसेनेच्या दुष्यंत चतुर्वेदी यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

**परभणी-हिंगोली** मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे संग्राम जामकर आणि विजय जामकर तसंच भाजपाचे विश्वजित बुधवंत यांनी माघार घेतली. त्यामुळे महायुतीतलं बंड शमलं आहे. शिवसेनेकडून सईद खान निवडणूक लढवत आहेत तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून विवेक नावंदर मैदानात आहेत.

मात्र काँग्रेसचे सुशील देशमुख यांनी आपला अर्ज  कायम ठेवला आहे. त्यामुळे इथं तिरंगी लढत होईल.

**<><><><><>**

योग ही भारतानं मानवजातीला दिलेली एक कालातीत देणगी आहे, योग मन, शरीर आणि आत्मा यांना एकत्र आणतो आणि एका अधिक निरोगी आणि सुसंवादी जगाला प्रेरणा देतो, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. ते आज अहमदाबाद इथं आयोजित जागतिक योगासन क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात दूरदृष्य प्रणालिच्या माध्यमातून संबोधित करत होते. सहभागी होताना प्रधानमंत्री म्हणाले की, पहिली जागतिक योग स्पर्धा योगासनाला एक जागतिक क्रीडा म्हणून ओळख देईल …

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री**

या स्पर्धेत ४० पेक्षा जास्त देशातले जवळपास २०० स्पर्धक सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाचं आगमन केरळममध्ये झाल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे. गेले काही दिवस केरळममध्ये पाऊस पडत आहे, मात्र आता मान्सूनचं आगमन झाल्याची अधिकृत घोषणा हवामान विभागाने केली आहे. पूर्वी वर्तवलेल्या अंदाजानुसार मान्सूनला काही दिवसांचा उशीर  झाला आहे.  पुढच्या २ ते ३ दिवसात मोसमी वारे राज्याच्या काही भागात पोहचण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध चित्रपट निर्माते दिग्दर्शक आणि चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांच्या पार्थिवावर आज मुंबईत सांताक्रूझ स्मशानभूमीत

अंत्यसंस्कार करण्यात आले. निहलानी यांचं हृदयविकारानं वयाच्या ७७व्या वर्षी निधन झालं. अभिनेता गोविंदा, फरहान अख्तर, शत्रुघ्न सिन्हा यांच्यासह चित्रपट सृष्टीतल्या अनेक मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहून निहलानी यांना आदरांजली वाहिली.

सेन्सॉरबोर्डाचे विद्यमान अध्यक्ष शशी शेखर वेंपती यांनी समाजमाध्यमावर निहलानी यांना आदरांजली वाहिली आहे. निहलानी यांच्या निधनामुळे चित्रपट सृष्टीतलं अनुभवी व्यक्तिमत्व हरपल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><><>**

राज्यसभेच्या आगामी निवडणूक आणि पोटनिवडणुकीसाठी भाजपने आज आपल्या ११ उमेदवारांची नावं जाहीर केली. त्यानुसार, मध्य प्रदेशातून तरुण चुघ आणि रजनीश अग्रवाल यांना तर राजस्थानमधून डॉ. अलका गुर्जर आणि डॉ. सतीश पुनिया यांना उमेवारी देण्यात आली आहे. गुजरातमधून राजु शुक्ला, मुकेश शुक्ला, मानसिंग परमार आणि जितेंद्र मेघजी कंजरिया यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अरुणाचल प्रदेशातून ताई तागक आणि मणिपूरमधून ए. शारदा देवी यांना उमेदवारी मिळाली आहे. ओदिशातल्या राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी देवाशिष सामंतराय यांना भाजपने उमेदवारी दिली आहे.

राज्यसभेच्या २४ जागांसाठी ही निवडणूक येत्या १८ तारखेला होणार आहे. तर ओदिशा, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.

**<><><><><><>**

गेल्या बारा वर्षांतल्या मजबूत वित्तीय व्यवस्थापनामुळे भारताला आर्थिक स्थैर्य कायम राखत शेतकरी, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, व्यवसाय तसंच समाजातल्या दुर्बळ घटकांना पाठिंबा देणं शक्य झाल्याचं केंद्रीय वाणिज्य मंत्री

पियूष गोयल यांनी म्हटलं आहे. मुंबईत आयोजित सिटी इंडिया परिषद २०२६ला ते दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते.

**<><><><><><>**

२९वे राष्ट्रीय ई गव्हर्नन्स पुरस्कार आज जाहीर झाले. केंद्रीय कार्मिक, सार्वजनिक तक्रारी, आणि निवृत्तीवेतन विभागाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलंय, की १० सुवर्ण, ६ रौप्य आणि एक परीक्षकांचं विशेष बक्षीस अशी एकूण १७ पारितोषिकं देण्यात येतील. ई गव्हर्नन्स मार्फत उत्तम प्रकल्प अंमलबजावणी करणाऱ्या विभाग, मंत्रालयं, राज्यसरकारं किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांना हा पुरस्कार देण्यात येतो. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमधे पुणे महानगरपालिका,नंदुरबार जिल्हा परिषद, तसंच सांगली जिल्ह्यातली कडेपूर ग्रामपंचायत यांचा समावेश आहे.

**<><><><><><>**

मुष्टीयुद्धाच्या जागतिक क्रमवारीत भारताने आपलं अव्वल स्थान कायम राखलं आहे. महिलांच्या ५७ किलो वजनी गटात जॅस्मिन लँबोरियाने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं आहे.

**//<><><><><><>//**